एमलीन पँखर्स्ट

लेखिका: **एमा फिशल**

चित्रे व सजावट: **मार्टिन रेम्फ्री**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



एमलीन पँखर्स्ट

एमलीनचा जन्म झाला त्यावेळी मुलींपेक्षा मुलगे चांगले असे बऱ्याच लोकांना वाटत असे.



ते म्हणत असत, "मुलांनी महत्त्वाच्या गोष्टी शिकल्या पाहिजेत. पण मुलींना त्याची गरज नाही. सर्व काही पुरुषांनीच ठरवायचे असते!"

परंतु एमलीन मोठी झाली ती हे सर्व बदलण्याची इच्छा मनात घेऊनच.

एमलीनचे बालपण आनंदात गेले. तिचे आई-वडील स्वभावाने चांगले आणि श्रीमंत होते. ते गरीब लोकांना मदत करण्याचा नेहमी प्रयत्न करत.

काहीवेळा एमलीनही त्यांना मदत करत असे.



श्रीमंत मुलींच्या देखील भविष्यात काय दडले आहे हे तिला लवकरच समजले.

तिचे पाच मोठे भाऊ डॉक्टर किंवा वकील होऊन त्यांना हवे तसे आयुष्य जगू शकत होते.



पण तिने आणि तिच्या चार धाकट्या बहिणींनी मात्र घरीच राहून योग्य नवरा मिळण्याची वाट पहावी अशीच सर्वांची अपेक्षा होती.

१४ वर्षांची असताना एमलीन एक दिवस आपल्या आईबरोबर एका सभेला गेली होती.

ही सभा 'मतदान' या विषयावर होती.

जे लोक मतदान करू शकत ते आपल्या देशाचा नेता कोण असावा आणि कोणते कायदे करावेत हे ठरवू शकत. पुरुष मतदान करू शकत पण स्त्रियांना मात्र तो अधिकार नव्हता.



एमलीन सभेतील सर्व भाषणे लक्षपूर्वक ऐकत होती.

"हे कायदे व नियम पुरुषांनी केले आहेत आणि स्त्रियांसाठी ते योग्य नाहीत!"

एक वक्त्या म्हणाल्या. "महिलांनाही मतदानाचा अधिकार मिळायला हवा आणि नवे कायदे करता यायला हवेत."



त्या काळातील इतर मुलींपेक्षा एमलीनच्या आई-वडिलांनी तिला अधिक शिक्षण दिले ते केवळ तिने शिक्षणाचा आग्रह धरला म्हणून.

मोठ्या मुलींसाठी तेव्हा फारशा शाळाही नव्हत्या. म्हणून एमलीन फ्रान्समधील एका शाळेत गेली.



पण घरी परत आल्यावर पुढे काय करावे हे तिला समजेना. मग तिची रिचर्ड मार्स्डन पॅंखर्स्ट यांच्याशी ओळख झाली...



आणि वयाच्या २१ व्या वर्षी एमलीनने त्यांच्याशी विवाह केला. ते ४० वर्षांचे होते.

रिचर्ड हे एक चांगले वकील होते पण त्यांना फारसे पैसे मिळत नव्हते. बहुतेक वेळा ज्यांना फी देणे शक्य नसे, अशांसाठी ते काम करत असत.

एमलीन त्यांना म्हणाल्या, “तुम्ही राजकारणात सहभागी व्हा, म्हणजे तुम्हाला बदल घडवून आणता येईल.”



त्या काळात अनेक लोकांना ही कल्पना धक्कादायक वाटली म्हणून त्यांनी पँखर्स्टना मत दिले नाही.


रिचर्ड यांच्यावरून एमलीन व त्यांच्या वडिलांचे खूप मोठे भांडण झाले आणि ते परत कधीच एकमेकांशी बोलले नाहीत.



या वेळेपर्यंत एमलीन व रिचर्ड यांना चार मुले होती. त्यांनी एक योजना बनवली.

एमलीन म्हणाल्या, “आपण लंडनला रहायला जाऊ, तिथे मी एक दुकान उघडेन, मग आपल्याला चांगले पैसे मिळतील.”

पण लंडनच्या त्या भागात राहणाऱ्या लोकांना एमलीनच्या दुकानातील वस्तू विकत घेणे शक्य नव्हते.




एकदा त्यांचा मुलगा फ्रँक गंभीर आजारी झाला आणि त्यातच तो मरण पावला.

डॉक्टर म्हणाले, “अस्वच्छ रस्ते, सांडपाण्याची वाईट अवस्था यामुळेच गरीब लोक लहान वयात मरण पावतात! तुमचा एकच मुलगा मरण पावला हे तुमचे नशीब समजा!”



कडक थंडीत ते मँचेस्टरला परत आले. गरिबांचे आयुष्य किती भयानक होते हे एमलीनच्या लवकरच लक्षात आले. अनेक जण कामगारांसाठी बांधलेल्या जागेमध्ये राहत असत. या जागा अतिशय अस्वच्छ आणि भयानक होत्या.



काही लोक अशा ठिकाणी रहायला जाण्याऐवजी उपाशी रहायला तयार होते. राजकारणी लोक मात्र त्यांच्या मदतीसाठी काहीच करत नव्हते म्हणून पँखर्स्ट पती-पत्नींनी त्यांना मदत करायचे ठरवले.




एमलीन म्हणाल्या, “श्रीमंतांकडे सर्व काही आहे आणि गरिबांकडे जवळ जवळ काहीच नाही. महिलांना जर हे सर्व बदलण्याचा अधिकार असता तर...!”

३० वर्षांच्या असताना एमलीन आपल्या फ्रान्समधील जुन्या मैत्रिणीला भेटायला गेल्या. पण तेव्हाच रिचर्ड आजारी पडल्याचे समजले, म्हणून त्या लगेच घरी परत आल्या.



पण तोपर्यंत फार उशीर झाला होता, ते मरण पावले होते.


आता कुटुंबाचे पालन पोषण करण्यासाठी एमलीनना नोकरी मिळवणे गरजेचे होते. त्यांच्या नव्या कामामुळे गरिबांचे आयुष्य किती कष्टमय होते हे एमलीनना प्रकर्षाने जाणवले.



एमलीन म्हणाल्या, “मतदानाचा हक्क मिळवून आवाज उठवल्याशिवाय मला काहीच बदलता येणार नाही.” आणि त्यासाठी काय करायला हवे ते त्यांना माहित होते...

आपली मुलगी ख्रिस्ताबेलच्या मदतीने एमलीन यांनी एक संघटना स्थापन केली.

चौकात, सार्वजनिक उद्यानात, जिथे शक्य असेल तिथे एमलीन भाषणे देत असत.



राजकारणी लोकांचे तीन महत्त्वाचे गट होते. कायदे बदलण्यासाठी त्यांच्या मदतीची गरज होती.

कामगार नेते कियर हार्डी म्हणाले, “मी मदत करेन.”



परंतु परंपरावाद्यांनी विधेयक नामंजूर होण्यासाठी कसून प्रयत्न केले.

अजून एका गटात प्रयत्न करायचा होता.

ख्रिस्ताबेलने विचारले, “तुम्ही उदारमतवादी, आम्हाला मत द्याल का?” परंतु ते तर तिच्याशी बोलायलाच तयार नव्हते.

तिने त्यांच्याकडून उत्तर मिळवण्याचा प्रयत्न केला आणि ती बातमी वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर झळकली.



तीन दिवसानंतर ख्रिस्ताबेलची सुटका करण्यात आली. त्या संध्याकाळची सभा आणखीच मोठी होती.



एमलीन यांनी आपल्या अनुयायांना सल्ला दिला: “आपण आपल्याकडे सर्वांचे लक्ष वेधून घ्यायला हवे. त्यासाठी आरडा-ओरडा करा! कामकाजात व्यत्यय आणा! कटकट करा!”

त्यांच्यापैकी बऱ्याच जणी म्हणाल्या, “आरडा-ओरडा? कामकाजात व्यत्यय? पण ते कसे काय करायचे? आम्हाला त्याची काहीच माहिती नाही.”

मग ते कसे करायचे हे एमलीन यांनी त्यांना दाखवले.



व्यक्ती कितीही महत्त्वाच्या असल्या, तरी राजकारणातील कोणीच आता सुरक्षित राहिले नव्हते.



पण लवकरच या महिला कोठे असतील ते पोलिसांना समजू लागले.

एमलीन म्हणाल्या, “आपण काही बोलण्याआधीच ते आपल्याला बाहेर काढतात. तुमचे फलक आणि झेंडे लपवून ठेवा. चेहरे झाकून घ्या. कोणाला तुमचा संशय यायला नको. मगच हल्ला चढवा!”

“असे वागणे महिलांना शोभत नाही,” राजकारणी लोकांनी प्रतिहल्ला केला.

पण एमलीन यांनी आपल्या अनुयायांना समजावले, “हा एकच मार्ग आहे. आपण लोकांचे लक्ष वेधून घेऊ!”

आणि त्या दिवस-रात्र नवनव्या योजना बनवू लागल्या.





एक दिवस एमलीन यांनी जाहीर केले, “आता आपण संसदेवर आपला पहिला मोर्चा नेऊया.”

त्यात चारशे स्त्रियांचा सहभाग होता. परंतु त्या संसदेपर्यंत पोचल्या तेव्हा संसदेचे दरवाजे बंद करण्यात आले होते.

महिलांची सामाजिक व राजकीय संघटना



एमलीननी समजावले, “ते आपल्याला अडवतील, पण त्यांना आपल्याला थांबवता येणार नाही. आपला लढा चालूच राहील!”

अशा प्रकारे त्यांचे मोर्चे अधिकाधिक मोठे होत गेले.



आता एमलीन ५० वर्षांच्या होत्या आणि त्यांचे काम वाढतच होते. त्यांनी विचार केला, “हे सर्व काम पुढे नेण्यासाठी मला आता मदतनिसाची गरज आहे.”

कियर हार्डी म्हणाले, “माझ्या डोळ्यासमोर यासाठी योग्य व्यक्ती आहेत. त्यांना समाजात स्थान आहे, ते हुशार आहेत आणि निधी कसा जमवायचा हे त्यांना चांगले माहित आहे!”



आता काळ बदलू लागला होता. स्त्रिया आता डॉक्टर होऊ लागल्या होत्या आणि विद्यापीठात शिकूही लागल्या होत्या- परंतु तरीही राजकारण्यांनी त्यांना मतदानाचा हक्क देण्याबाबत काहीच केले नाही. स्त्रियांचा संयम आता संपुष्टात येऊ लागला होता.



एमलीनना पाठिंबा देणाऱ्यांची संख्या दररोज वाढत होती.

त्या त्यांना विनंती करत: “आम्ही काय करावे ते सांगा. तुमच्यामुळे आम्हाला अधिक शक्तिशाली, शूर असल्याप्रमाणे वाटते आणि स्वतःचा अभिमानही वाटतो!”



महिला आता त्यांचा आवाज वाढवू लागल्या होत्या. पोलीसही आपला पोलीसी खाक्या दाखवू लागले होते.

मग एकदा दोन महिलांनी पंतप्रधानांच्या घराच्या खिडक्यांवर दगडफेक करून त्या फोडल्या. आता लढ्याचे स्वरूप बदलू लागले होते.



काही महिला एमलीनना म्हणाल्या, “आता थांबूया! ओरडणे आणि दंगा करणे आपल्याला शोभत नाही. अशाने पुरुष आपल्याला कधीच मतदानाचा अधिकार देणार नाहीत.”

इतर काहीजणी म्हणाल्या, “महिलांनी जास्त हुशारी दाखवू नये. आपण कसा विचार करावा हे पुरुष आपल्याला सांगतील!”

एमलीन यांची टवाळी करण्यात येऊ लागली, कोणी त्यांच्यावर थुंकत. एकदा तर त्यांना खाली पाडून लाथाही घालण्यात आल्या.

अनेक वर्षांपासून त्यांच्याकडे फारसे पैसे नव्हते. तशात त्यांची नोकरी गेली. मित्र-मैत्रिणी दूर गेल्या. अनेकदा त्यांना तुरुंगाच्या वाऱ्याही कराव्या लागल्या.



आणि तरीही काहीच फरक पडला नाही.

एमलीन म्हणाल्या, “पंतप्रधान पुरेसा प्रतिसाद देत नाहीत. खरे तर ते काहीच करत नाहीत. आपण परत मोर्चे काढायला हवेत.”

४५० महिलांच्या समवेत एमलीन यांनी संसदेवर मोर्चा नेला, पण पंतप्रधानांनी त्यांना भेट नाकारली. त्यानंतर जे काही घडले ते ‘ब्लॅक फ्रायडे’ (काळा शुक्रवार) म्हणून ओळखले जाते.




"आम्ही प्रयत्न सोडणार नाही!" एमलीन यांनी जाहीर केले.

आता राजकारणी देखील कंटाळले. राजा देखील या प्रकाराला कंटाळला होता. पण तरीही कोणी याबाबत काही केले नाही.



"सगळ्या खिडक्या फोडून टाका!' एमलीन म्हणाल्या. "आपण स्त्रिया आता संतापलो आहोत हे त्यांना दाखवून देऊया!"

आणि मार्च महिन्यातील एका दिवशी त्या लंडनमधील मोठ्या गजबजलेल्या बाजारात गेल्या आणि आपण किती संतापलो आहोत हे त्यांनी दाखवून दिले...



असंख्य स्त्रिया आता तुरुंगात होत्या. बऱ्याच वेळा एमलीनही त्यात असत. पण तुरुंगात जावे लागूनही त्यांच्या कामात खंड पडला नाही.


त्या म्हणायच्या, “विरोध करणे चालू ठेवा! घोषणा द्या! आरडा-ओरड करा! तोडफोड करा!”

आणि त्यांच्या अनुयायी त्याप्रमाणे करत.



त्या म्हणत असत: “आम्ही काहीही त्रास सहन करू. आमच्या नोकऱ्या, आमची घरे, आमचे स्वातंत्र्य गेले तरी चालेल. परंतु जिवात जीव असेपर्यंत आम्ही एमलीन पँखर्स्ट यांच्या पाठीशी उभ्या राहू.”





काहीजणी म्हणत, “सध्या फारच तोडफोड होते आहे.”

एमलीन म्हणत, “हे पुरेसे नाही! आपण याहून अधिक काही करायला हवे. गेली ५० वर्षे स्त्रियांनी शांतपणे मतदानाचा हक्क मिळवण्याचा प्रयत्न केला. आणि ५० वर्षात तो त्यांना मिळाला नाही!”

एक दिवस एक भयंकर अपघात झाला.

एमिली डेव्हिसन नावाच्या एका महिलेने महिलांना मतदानाचा हक्क न मिळाल्याच्या निषेधात घोड्यांची एक मोठी शर्यत थोपवण्याचा प्रयत्न केला. पण एका घोड्याने त्यांना धडक दिली आणि त्यात त्या मरण पावल्या.



एमलीन आता ५५ वर्षांच्या होत्या आणि परत एकदा तुरुंगात होत्या.


त्या म्हणाल्या, “आम्हाला मतदानाचा अधिकार तरी द्या नाहीतर आम्हाला जीव तरी देऊ द्या.” आणि त्यांनी अन्नत्याग केला. त्यांच्याबरोबर तुरुंगातील इतर अनेक महिलांनी देखील उपोषण सुरु केले.

“त्यांना सक्तीने अन्नग्रहण करायला लावा,” राजाने आदेश दिला. हा एक अत्यंत त्रासदायक आणि भयंकर उपाय होता.



त्यांनी एमलीनना देखील सक्तीने खाऊ घालण्याचा प्रयत्न केला, पण त्यांनी तो प्रयत्न सफल होऊ दिला नाही.

मग दरवेळी त्या मरणासन्न झाल्या की ते त्यांना तुरुंगातून सोडत, आणि जरा बऱ्या झाल्या की परत तुरुंगात टाकत.



या प्रकारात त्यांनी जवळ जवळ आपले प्राण गमावले.

पुढल्याच वर्षी पहिल्या जागतिक युद्धाला सुरुवात झाली. एमलीन व त्यांच्या सहकाऱ्यांना तुरुंगातून सोडून देताना राजकारणी म्हणाले, “आम्हाला मदत करा! लोक तुमचे बोलणे ऐकतात.”

मग एमलीन म्हणाल्या, “मतदानासाठी वाट पहावी लागेल. प्रथम हे युद्ध जिंकायला हवे!”



एकदा युद्धात विजय झाल्यावर राजकारणी म्हणाले, “स्त्रियांनी फार उत्तम कामगिरी केली आहे.” आणि त्यांनी ३० वर्षांवरील स्त्रियांना मतदानाचा हक्क दिला.

त्यानंतर १० वर्षांनी २१ वर्षांवरील सर्व स्त्रियांना मतदानाचा हक्क देण्यात आला आणि एमलीन यांचा लढा संपुष्टात आला.

त्यानंतर काही आठवड्यांतच त्यांचे निधन झाले.



अधिक माहिती


'सफ्रागेट्स'

एमलीन आणि त्यांच्या अनुयायांना 'सफ्रागेट्स' (मतदानाच्या अधिकारासाठी लढणाऱ्या) म्हणत असत. हा शब्द 'सफ्रेज' यावरून आला. त्याचा अर्थ आहे, मतदानाचा अधिकार असणे. आता १८ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार आहे.

.

महिलांसाठी मते

प्रसिद्धीसाठी एमलीन कायम नवे मार्ग शोधत असत. गरम हवा भरलेल्या प्रचंड फुग्यातून प्रसिद्धिपत्रके टाकण्याचा प्रयोगही त्यांनी केला. ध्वनीवर्धकातून घोषणा देत या महिला बोटीतून नदीत फेऱ्या मारत असत.



पदपथावर खडूने आपल्या मागण्या लिहीत असत. आपल्या कपड्यांवर त्या आपल्या मागण्यांचे फलक लावत असत. सापशिडी सारखा एक नवा खेळही त्यांनी तयार केला होता. त्याचे नाव होते 'तुरुंगाच्या आत-बाहेर जाणाऱ्या सफ्रागेट्स'!

दगडफेकीसाठी दगड गोळा करणे

महिला त्यांचा विरोध दर्शवण्यासाठी दगडफेक करून खिडक्या फोडत असत. लंडनमध्ये दगड मिळणे फारसे सोपे नसल्याने काही महिला रात्रीच्या वेळी ग्रामीण भागात जाऊन दगड गोळा करून आणत असत. एमलीन यांचा नेम काही चांगला नव्हता, सराव करूनसुद्धा डाउनिंग स्ट्रीट वरील एकही खिडकी त्यांना फोडता आली नव्हती!

एमलीन पँखर्स्ट यांच्या आयुष्यातील महत्त्वाचा घटनाक्रम

१८५८ एमलीन गुल्डन यांचा जन्म.

१८७९ रिचर्ड पँखर्स्ट यांच्याशी विवाह.

१८८० कन्या, ख्रिस्ताबेलचा जन्म.

१८९८ रिचर्ड पँखर्स्ट यांचा मृत्यू.

१९०३ महिलांच्या सामाजिक व राजकीय संघटनेची स्थापना.

१९०६ संसद भवनावर पहिला मोर्चा. एमलीन यांचा पहिला तुरुंगवास.

१९०९ चळवळीतील पहिल्या महिलेचे उपोषण.

१९१० 'ब्लॅक फ्रायडेला' पोलिसांची महिलांशी धक्काबुक्की.

१९१२ हातोड्या व कोयते घेऊन महिलांचे लंडनच्या उच्चभ्रू बाजारात मोर्चे.

१९१३ एमिली डेव्हिसनचा मृत्यू. एमलीन यांच्या वर्षभर तुरुंग वाऱ्या.

१९१४ पहिल्या जागतिक युद्धाची सुरुवात.

१९१८ जागतिक युद्धाची समाप्ती. ३० वर्षांवरील महिलांना मतदानाचा हक्क.

१९२८ २१ वर्षांवरील महिलांना मतदानाचा हक्क.

एमलीन यांचा मृत्यू.